# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४०३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१२/०७/२०१६.

**१) विवाहितेचा वियभंग करून धमकी दिली. :—**

दिनांक १०/०७/०१६ रोजी ०६.०० ते ०६.३० वा. दरम्यान फिर्यादी विवाहित महिला वय ४० वर्ष तिन्ही आरोपी यांचे घर एकमेकांच्या शेजारी आहेत. त्यांच्यात जुन्या घराच्या नाली बाबत वाद आहे. सदर वादावरून फिर्यादीचा पती हा खोदलेल्या कॉलमच्या खड्डयामध्ये दगड टाकित असतांना आरोपी क्र. १ ते ३ यानी भांडण केले व फिर्यादीला ढकलढुकल करून अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व सर्व लोकांचे मुडदे पाडुन आरोपी क्र. ०२ ने फिर्यादीचा विनयभंग करून लैंगिक कृत्य करण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३५४(अ),२९४,५०६,३४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. यादव पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**२) घरातुन सोन्या—चांदिचे ऐवज लंपास केले. :—**

दिनांक १०/०७/२०१६ रोजी ००.३० ते ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी भावेंद्र किशन रामटेके वय ४२ वर्ष, रा. गणेश लॉन्स गोवर्धन नगर तुमसर हे त्यांच्या परीवारासह घराला ताला लावुन बाहेर गावी गेले होते. कोणीतरी अज्ञात चोराने त्यांच्या घराच्या समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश केला व आलमारीचा लॉक तोडुन १ सोन्याचा मंगळसुत्र २ तोडे, १ सोन्याची अंगठी ४ ग्राम, चांदीची पायल २ नग ५ तोडा, १ सोन्याची नथ १ तोडा, १ लेडीज अंगठी ३ ग्राम, चांदीचे ८ सिक्के, १ दिवाल घडी असा एकुण कि. ५७,७५०/—रु. चा माल चोरून नेला. असे फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाधव पो.स्टे. तुमसर हे करीत आहे.

**३) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :—**

दिनांक ११/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. लाखनी व अडयाळ येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ९०० मिली. देशी दारू कि. २५०/—रू. तसेच जुगारातुन कि. १५१०/—रू. असा एकुण कि. १७६०/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(श्री. गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.